सीएनआर नं.– एमएचएलसी ३६०००००५८२०२४

**हिंदुस्थान कंम्पोझीट एम्लाईज युनियम –विरुध्द– श्री. गुणवंत तापसे**

**निशाणी क्र. यु.–९ वरील आदेश**

अर्जदारातर्फे प्रस्तुतचा अर्ज हा मुळ अर्जातील आरोपीचे नाव बदलविण्याकरीता दाखल केला आहे.

२. सदरील अर्जावर विरुध्द पक्षकाराचे म्हणणे मागवण्यात आले. गैरअर्जदारातर्फे सदरील अर्जावर म्हणणे दाखल करुन योग्य आदेश व्हावा असे म्हटले आहे.

३. दोन्ही विद्यीज्ञांचा प्रदिर्घ युक्तिवाद ऐकला. तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसते की, अर्जदाराने प्रस्तुतचा मुळ अर्ज महाराष्ट्र कामगार संघटनांना मान्यता व अनुचित कामगार प्रथेस प्रतिबंध कायदा, १९७१ च्या कलम ४८(१) अंतर्गत गैरअर्जदाराने न्यायालयाच्या आदेशाचे पालन न केल्यामुळे त्यांचेवर फौजदारी शिक्षा व्हावी म्हणुन दाखल केला आहे. अर्जदाराचे असे म्हणणे आहे की मुळ अर्जातील आरोपी श्री. गुणवंत तापसे, महाव्यवस्थापक यांनी गैरअर्जदार कंपणीतुन राजीनामा दिला आहे. त्यामुळे मा. औद्योगिक न्यायालय, भंडारा यांनी तक्रार यु.एल.पी.ए. क्र. १८/२०२२ मध्ये केलेल्या आदेशाची अमलबजावणी करण्याची जबाबदारी श्री. अनिल टेकापांडे, कंपनी व्यवस्थापक यांची आहे. त्यामुळे श्री. गुणवंत तापसे, महाव्यवस्थापक यांच्या ऐवजी श्री. अनिल टेकापांडे, कंपनी व्यवस्थापक, हिंदुस्थान कंम्पोझीट लिमीटेड, एम.आय.डी.सी. गडेगांव

LABOUR COURT

(रजेगांव), तह. लाखणी, जिल्हा भंडारा बदलविण्याची विनंती केली आहे. गैरअर्जदार यांनी सदर अर्जावर विशेष हरकत घेतली नाही. त्याचप्रमाणे अर्जदार व गैरअर्जदार यांच्यातील मुळ कारण निकाली काढण्यासाठी सदरील अर्ज मंजुर करणे गरजेचे आहे. म्हणुन योग्य न्यायदानाच्या दृष्टीकोनातुन मी खालील प्रमाणे आदेश पारित करतो.

**आ दे श**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार यांनी अर्जातील गैरअर्जदाराचे नाव कमी करुन श्री. अनिल टेकापांडे, कंपनी व्यवस्थापक, हिंदुस्थान कंम्पोझीट लिमीटेड, एम.आय.डी.सी. गडेगांव (रजेगांव), तह. लाखणी, जिल्हा भंडारा यांचे नाव १५ दिवसाचे आंत बदलविण्यात यावा.

भंडारा.                    (एफ.के. शेख)
दिनांक : ०४.१०.२०२४.                    न्यायाधिश,
कामगार न्यायालय, भंडारा.

LABOUR COURT